महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग,मुंबई - 400 001

**Phone no.** 22620390 / 22611871 **Email :** gmcgtmumbai@gmail.com


जा.क्र.शावैममुं./आस्था/जाहिरात/वरिष्ठ निवासी/ ११५६/२०२५

दि.०६/१०/२०२५

# ‡ जाहीरात ‡

विषय:- वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय परिसर, मुंबई येथील विविध विषयातील **वरिष्ठ निवासी** या संवर्गातील रिक्त पदे स्थानिक निवड मंडळामार्फत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरण्याबाबत.

संदर्भ :- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक: पदनि-२०२३/प्र.क्र.१९२/२३ वैसेवा-२, दि. १९ ऑगस्ट, २०२४.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय परिसर, मुंबई येथील विविध विषयातील **वरिष्ठ निवासी** या संवर्गातील रिक्त असलेली पदे स्थानिक निवड मंडळामार्फत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर १२० दिवसांकरीता भरण्याकरीता इच्छुक पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छूक पात्र उमेदवारांकडून मागविण्यात येत असलेले अर्ज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई महानगर परिसर या संस्थेच्या www.gmcmumbai.org या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ०७ दिवसांच्या कालावधीपर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टी वगळून) मा.अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, मुंबई- ०१ येथे अर्ज स्विकारले जातील. उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील. तसेच मुलाखतीचा दिनांक तसेच नियुक्तीबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

(डॉ. जितेंद्र संकपाळ)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
मुंबई- ४००००१

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई

रिक्त पदांचा तपशील संवर्ग- वरिष्ठ निवासी

| अ.क्र. | विषय | रिक्तपदे | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १. | औषधवैद्यकशास्त्र (Medicine) | ०३ | MD/MS/DNB in the concerned subject from recognition University for NMC Norms. |
| २. | बधिरिकरणशास्त्र (Anesthesia) | ०१ | |
| | एकुण | ०४ | |

महत्वाची टिप :-

१. उमेदवार हा भारताचा नागरिक असावा.

२. उमेदवाराचे वय : नियुक्तीवेळेस कमाल ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. मानधन: दरमहा ठोक मानधन प्रचलित शासकीय नियमानुसार

नियम व अटी :-

१. सदर पदावर मध्यवर्ती समिती संचालनालय, वै.शि.व संशोधन, मुंबई यांच्या मार्फत बंधपत्रीत उमेदवारांची निवड झाल्यास अथवा बंधपत्रित उमेदवार प्राप्त झाल्यास आपणांस कोणतीही पूर्वकल्पना न देता आपले नियुक्ती आदेश रद्द / समाप्त करण्यात येतील.

२. सदरचा आदेश प्राप्त होताच आपण कामावर हजर झाल्याचे विभाग प्रमुख यांचे मार्फत अधिष्ठाता कार्यालयास कळविण्यात यावे. आदेश निर्गमित होण्याच्या दिनांकापासून ७ दिवसाच्या आत आपण हजर न झाल्यास आपली नियुक्ती आपोआप रद्द होईल.

३. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई हे कोविड रुग्णालय झाल्यास आपणास कोविड पॉझिटिव्ह वॉर्डमध्ये काम करणे बंधनकारक असेल.

४. आपली नियुक्ती ही पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपाची आहे व सदरची नियुक्ती ही संपूर्णता नवीन नियुक्ती आहे. त्यामुळे तुमच्या अगोदरच्या कोणत्याही नियुक्तीचा कालावधी जेष्ठता अगर इतर सेवा विषयक बाबींसाठी विचारात घेतली जाणार नाही. तसेच आपणांस मिळणारे वेतन हे ठोक रक्कम असल्याने आपणांस इतर शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्याप्रमाणे कोणत्याही प्रकारचे इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

५. आपणांस शासकीय रुग्णालयाच्या / संस्थेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल.

६. आपल्या नियुक्तीच्या कालावधी मध्ये आपण रुग्णालयीन कामाकरीता २४ तास उपलब्ध राहणे बंधनकारक असल्यामुळे आपणांस निवासी वसतीगृहामध्ये राहणे बंधनकारक राहील.

७. निवासी वसतीगृहाचे वाटप करण्यात आले असल्यास, नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

८. उमेदवार रुजु होण्यापूर्वी महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई नियम १९६५ च्या अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

९. आपणांस नियुक्तीच्या कालावधीत राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिन्याची अगोदर लेखी सुचना द्यावी लागेल अन्यथा एक महिन्याचे वेतन भरावे लागेल अन्यथा अनामत रक्कम शासन तिजोरीत जमा करण्यात येईल.

१०. सदरहु कालावधीमध्ये आपली सेवा समाधानकारक नसेल तर आपली नियुक्ती पुर्वसूचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

११. आपली नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे वर निर्देशित कालावधीकरीताच असल्यामुळे नियमित नियुक्ती संदर्भात आपणांस न्यायालयात दाद मागता येणार नाही तसेच सादर केलेला रुजू अहवाल सर्व अटी मान्य आहेत हे गृहित धरण्यात येईल.

१२. सदरहू नियुक्ती कालावधीमध्ये आपणास खाजगी वैद्यकीय व्यवसाय अथवा इतरत्र खाजगी/शासकीय संस्थेत काम करता येणार नाही. तसे आढळल्यास आपल्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(डॉ. जितेंद्र संकपाळ)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
मुंबई- ४००००१